सकाळ बुलडाणा TO

## संक्षिप्त



चिखली : वृक्षदिंडीमध्ये सहभागी विद्यार्थी

# हरीतपर्वातंर्गत श्री. शिवाजी महाविद्यालयामध्ये वृक्षदिंडी

**चिखली, ता. १२** : स्थानिक श्री. शिवाजी विज्ञान, कला आणि वाणिज्य महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय सेवा योजना आणि राष्ट्रीय छात्र सेनेच्या संयुक्त पुढाकारातून मंगळवारी (ता. ६) हरीतपर्वातंर्गत वृक्षदिंडीचे आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन. बी. भुसारी यांच्या मार्गदर्शनामध्ये वृक्षसंवर्धन व पर्यावरण जागृतीच्या हेतूने महाविद्यालय परीसरामध्ये 'एक कर्मचारी एक वृक्ष' या घोषणेनुसार वृक्ष लावण्याचा संकल्प करण्यात आला आणि त्याप्रमाणे वृक्षलागवड सुद्धा करण्यात आली. वृक्षदिंडीच्या निमीत्ताने कडुनिंब, गुलमोहर, करंज, पिंपळ आदी जातीच्या वृक्षांची रोपे सामाजिक वनीकरण विभागाच्या सहकार्याने उपलब्ध झाल्यानंतर महाविद्यालय परीसरामध्ये वृक्षलागवड करण्यात आली. या वृक्षदिंडीच्या यशस्वितेसाठी प्रा.के.डी.पेन्शनवार, प्रा.डॉ.एम.बी.सोनुने, प्रा.डॉ.वनिता पोच्छी, श्री.सिद्धेश्वर सोळंकी, प्रा.जी.एम.डोंगरे, प्रा.डॉ.आर.पी.गवई, प्रा.डी.आर.सावळे, कार्यक्रम अधिकारी प्रा.विष्णू पडवाल, सामाजिक वनीकरण विभागाचे प्रफुल्ल मोरे, श्री.इंगोले, केशव सोनवणे आदींसह राष्ट्रीय सेवा योजना आणि राष्ट्रीय छात्र सेनेच्या स्वंयेसेवकांनी विशेष पुढाकार घेतला होता.